**महाराष्ट्र शासन**

# जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिक

(महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण मे 23, 2001 नियम-9 अंतर्गत दिवाणी न्यायालयीन अधिकार)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्यायभवन, नासर्डी पुलाजवळ, नाशिक-11

Email ID- ncvc1@rediffmail.com दुरध्वनी क्र. 0253-2950261

जा.क्रं./जि.जा.प्रपस अ.नगर/आस्था/फेर-निविदा/2025-26/ ,

दि.

## फेर ई-निविदा

उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिक या कार्यालयासाठी मारुती सुझुकी एर्टिगा/टोयोटा रुमिऑन(7+1)सीटर - 01 व टोयोटा ईटिऑस / मारुती स्विफ्ट डिझायर कार- 01 ही दोन वाहने मंजुरी आदेशाच्या दिनांकापासुन सन 2025-2026 व सन 2026-2027 या दोन वर्षाच्या कालावधीकरीता भाड्याने करारावर घेण्यासाठी ई-निविदा दोन लिफाफा पध्दतीने अधिकृत वाहनधारकाकडुन / परवानाधारकाकडून मागविण्यात येत आहेत. भाड्याने घेण्यात येणारी वाहने ही नाशिक या जिल्ह्यात तसेच शासकीय कामासाठी अन्य जिल्ह्यात दौरा करणेसाठी वापरण्यात येईल. त्या अनुषंगाने उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिक हे ई-निविदा मागवित आहेत.

| अ.क्र. | वाहन तपशील | वाहन संख्या | दर तपशील |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | गाडीचे 1.दरमहा 2000 कि.मी. पर्यंतचा एकत्रित दर (प्रती दिवस)<br>2.प्रती कि.मी. दर (2000 कि.मी. नंतर) (यामध्ये वाहन चालकाचे वेतन, पार्किंग, टोल टॅक्स व इतर भत्ते, इंधन व वंगण, रात्रीचा खोळंबा, दुरुस्ती इं.) सर्व खर्चाचा समावेश राहील.<br>मारुती सुझुकी एर्टिगा/टोयोटा रुमिऑन(7+1)सीटर - 01 | 01 | 2. प्रती महिना दर (2000 कि.मी.)<br>2. प्रती किमी दर (2000 कि.मी. नंतर) |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | **गाडीचे** 1.**दरमहा** 2000 **कि.मी. पर्यंतचा एकत्रित दर** (**प्रती दिवस**)<br>2.**प्रती कि.मी. दर** (2000 **कि.मी. नंतर**) (**यामध्ये वाहनचालकाचे वेतन, पार्किंग, टोल टॅक्स व इतर भत्ते, इंधन व वंगण, रात्रीचा खोळंबा, दुरुस्ती इं.**) **सर्व खर्चाचा समावेश राहील.**<br>**टोयोटा ईटिऑस / मारुती स्विफ्ट डिझायर कार**- 01 | 01 | 2. **प्रती महिना दर** (2000 **कि.मी.**)<br><br>2. **प्रती किमी दर** (2000 **कि.मी. नंतर**) |

**उपायुक्त तथा सदस्य**
**जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,**
**नाशिक**

**वाहनभाडे ठेका निविदेचे वेळापत्रक**

| | |
|---|---|
| 1 | संपुर्ण निविदा प्रक्रीया ही ई-निविदा व्दारे होणार असुन निविदा सुचना, अटी व शर्ती शुध्दीपत्रक इत्यादी माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेस्थळावर उपलब्ध आहे. |
| 2 | ई-निविदा फॉर्म विक्री सुरु होण्याचा कालावधी दिनांक :- 11.03.2026 **सकाळी** 11:00 पासुन |
| 3 | निविदा ऑनलाईन भरणे (upload) करण्याचा कालावधी दि. 11.03.2026 ते दि. 20.03.2026 **सकाळी** 11:00 वाजेपर्यंत असेल. |
| 4 | ऑनलाईन निविदेचा तांत्रिक लिफाफा दि. 23.03.2026 रोजी दुपारी 03:00 वाजता उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिक येथे उघडण्यात येतील त्या दिवशी निविदेसोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रतिसह उपस्थित राहावे. काही अपरिहार्य कारणामुळे काही अपरिहार्य कारणास्तव दिनांक व वेळेत बदल झाल्यास त्याबाबत या कार्यालयाचे सुचना फलकावर लावण्यात येईल किंवा ई-मेलव्दारे कळविण्यात येईल. |
| 5 | ऑनलाईन निविदेचा सिलबंद / व्यापारी लिफाफा दि. 24.03.2026 **रोजी सकाळी** 12:00 वाजेपर्यंत उघडण्यात येईल. (तांत्रिक लिफाप्यातील अटी व शर्ती / कागदपत्रे पुर्ण झाल्यास) |

4. ई-निविदेचा इतर तपशिल http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, सदर विहीत नमुन्यामध्येच पुरवठाधारकांनी आपल्या निविदा ऑनलाईन पध्दतीने सादर कराव्यात.

5. ई-निविदेसाठी ठेकेदाराकडे डिजिटल सिग्नीचर सर्टिफिकेट (DSC) असणे आवश्यक आहे व निविदा संकेतस्थळावर रजिस्टर होणे आवश्यक आहे.
6. निविदेबाबतचे अंतिम अधिकार उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिक यांचेकडे राखुन ठेवण्यात येत आहेत.

**उपायुक्त तथा सदस्य**
**जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,**
**नाशिक**

ई-निविदाकरीता रु.50,000/- बयाणा रक्कम ऑनलाईन SBI नेटबँकिंग व्दारे जमा करुन सदर निविदेमध्ये /
प्रक्रीयेमध्ये पुरवठादारांना सहभागी होता येईल तसेच ई-निविदा फी 3000/- ऑनलाईन पध्दतीने जमा
करण्यात यावे.

1. पोष्टाने आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.
2. निविदा ही दोन लिफाफा पध्दतीने सादर करावी लागेल.
3. दोन लिफाफ्यापैकी लिफाफा क्र.1 हा तांत्रिक लिफाफाअसेल व लिफाफा क्र.2 व्यापारी लिफाफा (दराचा) असेल.
4. तांत्रिक लिफाफा क्र. 1 मध्ये मागविण्यात आलेली सर्व कागदपत्रे, निविदेतील अटी व शर्तीची पूर्तता करणारा राहील
व लिफाफा क्रमांक 2 हा दराचा लिफाफा राहील. तांत्रिक लिफाफ्यामधील बाबींची पूर्तता होत असल्यावरच दराचा
लिफाफा (क्र.2 चा लिफाफा) उघडणेत येईल.

**1) अ) लिफाफा क्र. 1 – तांत्रिक लिफाफा**

1. निविदाधारक संस्था प्रोपायटरशीप, पार्टनरशीप, प्रायव्हेट लिमिटेड, पब्लिक लिमिटेड, फर्म, सहकारी संस्था, इत्यादी
ज्या प्रकारची नोंदणी असेल त्या प्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याकडील नोंदणी केलेले नोंदीप्रमाणपत्र (छायांकित
2. प्रत) बयाणा रक्कम भरल्याचे चलन (छायांकीत प्रत)
3. सन 2024-25 या वित्तीय वर्षाचे आयकर भरल्यासंबंधी निपटारा प्रमाणपत्र (क्लिअरन्स सर्टिफिकेट)
4. वाहतूक परवाना प्रमाणपत्राची प्रत अद्ययावत असणे आवश्यक आहे.
5. वाहतूक कर भरल्याचे प्रादेशिक परिवहन विभागाचे प्रमाणपत्र अद्ययावत असणे आवश्यक आहे.
6. वाहनाचा विमा पॉलिसी उतरल्याचे प्रमाणपत्र अद्ययावत असणे आवश्यक आहे.
7. अद्ययावत प्रदूषण प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
8. निविदाधारक शासकीय व निमशासकीय नसल्याचे प्रतिज्ञापत्र असणे आवश्यक आहे.
9. निविदाधारक किंवा त्यांच्या संस्थेवर कोणत्याही प्रकारचा दंडात्मक दखलपात्र गुन्हा नसल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक
आहे.
10. राष्ट्रीयकृत बँकेचे रुपये 1,00,000/- पर्यंतचे नजीकच्या कालावधीचे मूळ सॉल्व्हन्सी सर्टिफिकेट.
11. व्यवसाय कर/GST (करंट) भरल्याचे प्रमाणपत्र (माहे मार्च-2025 अखेरचे)

**2) ब) लिफाफा क्र. २-व्यापारी किंवा दर संबंधीचा लिफाफा**

1) EMD व Tender Fee पोच पावती (online प्रत)
2) निविदेचे दर विहीत केलेल्या फॉर्म नं २ मध्ये भरावे.
3) निविदेचे फॉर्म नं २ मध्ये दिलेल्या प्रत्येक बाबीचे दर नमूद करावेत. दर अंकी व अक्षरी नमूद करावेत.

**उपायुक्त तथा सदस्य**
**जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,**
**नाशिक**

**निविदा अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.**

1.निविदा दोन लिफाफा पद्धतीने अवलंबून करून सादर करावयाची आहे.

(लिफाफा क्र. १ तांत्रिक, लिफाफा क्र. २ दराचा लिफाफा)

2.निविदाधारकाच्या निविदा अंतिमरित्या स्वीकारण्यात येवून त्याप्रमाणे वाहनभाडे आदेश देण्यात येतील. दिलेल्या कामात

त्यांच्याकडून कसूर झाल्यास अथवा अटी व शर्तीचा भंग झाल्यास भरलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करून शासनखाती

जमा करण्यात येईल.

३.गुणवत्तेनुसार व मानकानुसार वाहन भाड्याचे आदेश एकापेक्षा अधिक वाहन पुरवठदार देण्याचा हक्क राखून ठेवला

आहे.

4.या कार्यालयाचे कार्यक्षेत्र नाशिक जिल्हा आहे. तसेच गृहचौकशीसाठी, न्यायालयीन कामासाठी, बैठकीसाठी या

जिल्ह्याबाहेरील इतर जिल्ह्यात देखील दक्षता पथकांकडून किंवा समिती अधिकारी यांचेकडून प्रवास केला जाईल. वाहनाचे

किलोमीटर दर देताना त्यात वाहनचालकांचे वेतन व भत्ते, इंधन व वंगण, रात्रीचा खोळंबा/थांबा इत्यादी सर्व खर्चाचा समावेश

करून दर भरणे आवश्यक आहे.

5.वाहन चालविणाऱ्या वाहन चालकाकडे वाहन चालविण्याचा वैध परवाना असणे आवश्यक आहे व त्याचे वय १८ ते ५०

दरम्यान असावे. तसेच उपलब्ध करून देण्यात आलेल्या वाहन चालकाचा संपूर्ण तपशील या कार्यालयास उपलब्ध करून

द्यावा.

6.निविदेसोबत प्रादेशिक परिवहन विभागाचे स्वतःच्या वाहनाचा वाहतूक कर पूर्ण भरल्याचे नजीकचे प्रमाणपत्र सोबत जोडणे

आवश्यक आहे. तसेच वाहतूक करण्यासंबंधी सक्षम प्राधिकरणाच्या कराराचा परवाना जोडणे आवश्यक आहे. तसेच दिनांक:-

31/03/2025 पर्यंत किंवा वाहन भाड्याने घेण्यात येणाऱ्या कालावधीत वाहनाचा व वैयक्तिक विमा भरलेला असणे आवश्यक

आहे.

7.निवड केलेल्या निविदाधारकास या कार्यालयाच्या कामकाजाच्या वेळेसाठी **मारुती सुझुकी एर्टिगा/टोयोटा रुमिऑन** (7+1) **सीटर**

- 01 **व टोयोटा ईटिऑस** / **मारुती स्विफ्ट डिझायर कार**- 01 त्या वेळेस वाहन उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील. वाहने ४

वर्षांपेक्षा जास्त जुनी असता कामा नयेत.

8.यशस्वी निविदाधारकाने वैध परवाना असलेले वाहन व चालक दोन्ही गाड्यांसाठी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

9.वाहनभाडे निविदेत फेरबदल / अटी कमी व जास्त करण्याचा अधिकार व काहीही कारण न देता कोणतीही निविदा उघडणे

किंवा संपूर्णतः अथवा अंशतः स्वीकारण्याचा अथवा नाकारणेचा अधिकार उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र

पडताळणी समिती नाशिक यांनी राखून ठेवला आहे.

10.वाहनभाडे दराची निविदा मंजूर करण्यात आल्यास, निविदेत नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन

करणेबाबत रुपये 100/- च्या न्यायालयीन मुद्रांकावर (स्टॅम्प पेपर) करारनामा करून द्यावा लागेल.

11.सुरक्षा ठेव ही परतावा रक्कम जरी असली तरी वाहनभाडे दर ज्या कालावधीसाठी मंजूर केला असेल तोपर्यंत ती रक्कम परत

मिळणार नाही. याबाबत विलंब झाल्यास सदरच्या रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

12.परिवहन विभागाचे वाहतुकीसंबंधी सर्व अटी/नियम पूर्ण करणे/नियम पाळणे हे मंजूर दर निविदाधारकास बंधनकारक

राहतील. वाहन दौऱ्यावर असताना काही अपघात झाल्यास तसेच अपघातात अधिकारी/कर्मचारी यांना इजा झाल्यास, त्यासाठी

येणारा दवाखान्याचा खर्च निविदाधारकास सोसावा लागेल.

13.निविदाधारकांनी त्यांचे दर प्रतिगाडी, दरमहा 2000 कि.मी. पर्यंतचा एकत्रित दर/12 तासाचा दर/2000 कि.मी. नंतरचे प्रति

किलोमीटर याप्रमाणे नमूद करावे त्याशिवाय निविदा विचारात घेतले जाणार नाही.

14.या कार्यालयाच्या कामकाजासाठी दौरे करताना दुर्गम/अतिदुर्गम/डोंगराळ दौऱ्यावर जावे लागते. अशा भागातील खराब व खडतर रस्त्यांमुळे निविदाधारकाच्या वाहनाचे नुकसान झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

15.वाहतूक निविदेची मुदत मंजूर दिनांकापासून 2 वर्षे पर्यंत अंमलात राहील व पुढील कालावधीकरीता मुदतवाढ देण्याचा अधिकार उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती नाशिक यांनी राखून ठेवलेला आहे.

16.निविदाधारकांच्या निविदा स्वीकृत केल्या जातील अशा निविदाधारकांची अनामत ठेव रक्कम निविदेची विहित कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्यांना परत करण्यात येईल.

17.यशस्वी निविदाधारक निविदेत दिलेल्या मुदतीत वाहन पुरविण्यास असमर्थ ठरला किंवा दिलेली सेवा समाधानकारक नसली तर या कार्यालयामार्फत फेर निविदा मागविण्यात येतील. वाहनभाडे दराच्या जास्त रकमेच्या निविदा अंतिम झाल्यास शासनास जो जादा खर्च करावा लागेल तो जास्तीचा खर्च अटी व शर्तीचा भंग केलेल्या निविदाधारकांकडून वसूल करण्यात येईल. तसेच कमी दराच्या निविदा प्राप्त झाल्यास, याबाबत पूर्वीच्या निविदाधारकांचा कोणताही हक्क राहणार नाही. शिवाय पूर्वीच्या निविदाधारक यांनी अटी व शर्तीचा भंग केला म्हणून रुपये 100/- प्रतिदिनी दंडास पात्र राहील.

18.वाहन भाड्याचे देयक सादर करताना वाहन ज्या अधिकाऱ्यांनी वापरले आहे व जितके किलोमीटर वापरले आहे व ज्या ज्या ठिकाणी शासकीय कामानिमित्त दौरे करण्यात आले आहेत त्याबाबतचे संबंधित अधिकाऱ्याचे स्वाक्षरी देयकासोबत असणे आवश्यक आहे. दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत लॉगबूक नोंदवहीप्रमाणे मागील

महिन्याचे देयकाची रक्कम अदा करण्यास उशीर झाला तर, निविदाधारकास कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही किंवा व्याज मागता येणार नाही.

19.मंजूर निविदाधारकांकडे दौऱ्यासाठी लागणारे डिझेल/ऑईल/स्पेअरपार्ट/वाहनचालकांचे वेतन व भत्ते, रात्रीचा खोळंबा/थांबा इत्यादी वरील खर्च निविदाधारकास करावा लागेल. निविदाधारकास मोटर व्हेईकल ॲक्ट तसेच भाडे तत्वावर घेण्यात येणाऱ्या वाहनासंबंधी महाराष्ट्र शासनाने केलेले कायदे/शासन निर्णय/शासन आदेशमधील तरतुदी पाळणे बंधनकारक राहतील. त्यातील तरतुदींचा भंग त्यांनी किंवा त्यांच्या वाहनचालकाकडून केला जाणार नाही, याची त्यांनी दक्षता घ्यावी.

20.मंजूर निविदेच्या आदेशाच्या कालावधीत जर डिझेल/ऑईल/स्पेअरपार्ट अथवा संबंधित कोणत्याही साहित्याचे दर वाढल्यास वाहतूक दरात वाढ करून मिळणार नाही. किंवा त्या प्रकारची मागणी करता येणार नाही.

21.निविदाधारकाच्या बिलातून नियमानुसार आयकर रक्कम कपात करण्यात येईल.

22.दौऱ्यासाठी वापरलेल्या वाहनाचे प्रमाणित किलोमीटर नुसार देयक अदा करण्यात येईल.

23.ई-निविदा स्वीकारण्याची अंतिम दिनांक: 20.03.2026 रोजी सकाळी 11.00 वाजेपर्यंत राहील.

24.ई-निविदा भरतेवेळी जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे ई-निविदा बयाणा रक्कमेचा राष्ट्रीयकृत बॅंकेतील धनादेश संशोधन अधिकारी, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिक यांच्या नावाने नाशिक येथे देय असलेला असावा. धनादेश राष्ट्रीयकृत बॅंकेचाच असणे अनिवार्य आहे.

25.ई-निविदा उघडताना प्रथम पाकिट क्र. १ (तांत्रिक लिफाफा) उघडण्यात येईल. पाकिट क्र. १ मधील आवश्यक ती सर्व कागदपत्रे पूर्ण असतील तरच (व्यापारी दराचा लिफाफा) पाकिट क्र. २ उघडण्यात येईल. पाकिट क्र. १ अपूर्ण असल्यास पाकिट क्र. २ उघडण्यात येणार नाही.

26.प्राप्त ई-निविदातील लिफाफा क्र. १ तांत्रिक लिफाफा या कार्यालयातील खरेदी समितीसमोर ई-निविदाधारक/ई-निविदाधारकाचे अधिकृत अथवा प्राधिकृत प्रतिनिधी यांच्या समक्ष दि. 23.03.2026 रोजी दुपारी 03.00 वाजता उघडण्यात येतील. या वेळी सर्व निविदाधारकांनी निविदेसोबत जोडलेल्या मूळ कागदपत्रांसह उपस्थित रहावे. काही अपरिहार्य कारणास्तव दिनांक व वेळेत बदल झाल्यास त्याबाबत या कार्यालयाच्या सूचना फलकावर सूचना लावण्यात येईल किंवा ई-मेलद्वारे कळविण्यात येईल.

27.ई-निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार उपायुक्त, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिक यांनी राखून ठेवला आहे.

28.ई-निविदा मंजूर झाल्यास नियमानुसार देय असलेले मुद्रांक शुल्क भरून करारनामा करून द्यावा लागेल.

29.ई-निविदा मंजूर केल्याच्या दिनांकापासून तात्काळ दुसऱ्या दिवसापासून वाहनाची संपूर्ण व्यवस्था करावी लागेल.

30.मुदतीत प्राप्त न झालेली ई-निविदा किंवा अपूर्ण कागदपत्रे असलेली ई-निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.

31.आयकर नोंदणी प्रमाणपत्र (पॅनकार्ड) निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

32.सन 2024-25 अखेरचे विक्रीकर प्रमाणपत्र/GST साक्षांकित प्रत निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

33.व्यवसाय कर भरल्याचे माहे मार्च-2025 अखेरचे प्रमाणपत्र, ई-निविदा फॉर्म-सोबत जोडणे आवश्यक आहे.

34.निविदाधारकाने यापूर्वी सरकारी/निमसरकारी संस्थेत अशा प्रकारचे काम केले असल्यास संबंधित संस्था प्रमुखाचा अनुभवाचा दाखला असल्यास सोबत जोडावा.

35.बयाणा/अनामत रक्कम यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही. तसेच देयकाची रक्कम अदा करण्यास उशीर झाल्यास त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

36.बयाणा रक्कम (3%) मंजूर निविदाधारकांच्या बाबतीत सुरक्षा अनामत रक्कम म्हणून वर्ग करण्यात येईल.

37.मंजूर केलेले दर हे आदेश दिनांकापासून 2 वर्ष संपेपर्यंत किंवा पुढील या कार्यालयाच्या आदेशान्वये पुढील कंत्राट/पुरवठादार/ठेका मंजूर होईपर्यंत अंमलात राहतील.

38.अचानक वाहन पुरवठा बंद केल्यास पर्यायी व्यवस्थेमुळे होणाऱ्या जादा खर्चास ठेकेदार जबाबदार राहील व जादा खर्च होणारी रक्कम त्याच्या सुरक्षा ठेव रकमेवरून अथवा देय असणाऱ्या इतर कोणत्याही रकमेवरून वसूल केली जाईल.

39.ई-निविदेत नमूदप्रमाणे मूळ कंपनी प्रमाणे वाहन पाहिजे (त्यात बदल नको)

40.ज्या ठेकेदारांनी ई-निविदा भरलेली आहे त्यांना ठेका चालविणे बंधनकारक राहील.

41.सदर निविदेस अंतिम मान्यता देणे ही बाब शासनाचे अंतिम मान्यतेच्या अधीन राहील.

टिप :- वरील सर्व अटी, नियम व सूचना मी/आम्ही वाचल्या असून त्या मला/आम्हाला आमच्या संस्थेस संपूर्ण मान्य आहेत व त्या स्वीकृत करुन स्वाक्षरीसह ई-निविदा सोबत जोडल्या आहेत.

दिनांक :

निविदा धारकाचे नाव : ________

सही व शिक्का

**दिनांक-**

**प्रति,**
**मा. उप आयुक्त तथा सदस्य,**
**जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती**
**नाशिक.**

मी, याद्वारे उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती नाशिक या कार्यालयाकरिता वाहनभाडे तत्वावर पुरविण्यासाठी मी व्यापारी आणि तांत्रिक लिफाफा सिलबंद स्वरूपात सादर करीत आहे. निविदेमधील सर्व अटी व शर्ती मला मान्य असून त्यास मी बांधील आहे.

## प्रतिज्ञापत्र

मी याद्वारे प्रतिज्ञा करतो/करते की, मी सादर केलेली निविदा मंजूर झाल्यास निविदेतील कामकाज मी उच्च गुणवत्तेने व दिलेल्या मुदतीत पार पाडेल व त्यासाठी आवश्यक ते मनुष्यबळ उपलब्ध करून देईल व वाहन चालू ठेवेल. माझ्या कामकाजात कोणताही दिरंगाई / टाळाटाळ झाल्यास उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिक निश्चित करतील अशा दंडास मी पात्र राहील.

**निविदाधारकाची स्वाक्षरी**

1) निविदा ज्या संस्थेकडून सादर करण्यात आली त्या संस्थेचे/उद्योगाचे नाव व पत्ता

______________________________________________________________________________
______________________________________________________________________________
______________________________________________________________________________
______________________

2) निविदाधारकाचे संपूर्ण नाव व पत्ता

______________________________________________________________________________
______________________________________________________________________________
______________

दूरध्वनी क्रमांक _______ मोबाईल क्रमांक _______

ईमेल आय.डी. ______________________________

**साक्षीदार-**

1) __________________________ रा. __________________________________

2) __________________________ रा. __________________________________

**निविदा फॉर्म क्रमांक – 1**

**तांत्रिक लिफाफा**

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती नाशिक यांचेकडे वाहनभाडे तत्वावर पुरविण्यासाठी अधिकृत एजन्सीची/अभिकर्त्याची एजन्सीची नेमणूक करण्याकरीता सीलबंद निविदामध्ये दिलेल्या सूचनांनुसार खालीलप्रमाणे दरपत्रक तपशील व इतर बाबींची माहिती देत आहोत.

| **अ.क्र.** | **तपशील** | **माहिती** |
|---|---|---|
| 1 | निविदाधारकाच्या फर्म / संस्थाचे नाव | |
| 2 | निविदाधारकाचे पूर्ण नाव | |
| 3 | पत्ता, दूरध्वनी क्रमांक व ई-मेल | |
| 4 | निविदाधारक संस्था प्रोप्रायटरीशिप, पार्टनरशिप, प्रायव्हेट लिमिटेड, पब्लिक लिमिटेड, फर्म, सहकारी संस्था, इत्यादी ज्या प्रकारची नोंदणी असेल त्याची नोंदणी प्रमाणपत्र (छायांकित प्रत जोडावी) | |
| 5 | पॅन/टॅन नंबर (छायांकित प्रत जोडावी) | |
| 6 | सन 2024-25 या आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्र (छायांकित प्रत जोडावी) | |
| 7 | सेवाकर (Service Tax Registration) नोंदणी प्रमाणपत्र (छायांकित प्रत जोडावी) | |
| 8 | सन 2024-25 माहे मार्च 2025 अखेर सेवा कर भरल्याबाबत प्रमाणपत्र किंवा त्याबाबतचे चलनाची छायांकित प्रत. | |
| 9 | निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रु. 100 च्या स्टॅम्पवर नोटरी/कार्यकारी दंडाधिकारी यांचेसमोर केलेले प्रतिज्ञापत्र. | |
| 10 | अद्ययावत प्रदूषण प्रमाणपत्र प्रत. (छायांकित प्रत जोडावी) | |
| 11 | निविदाधारक शासकीय व निमशासकीय नसल्याचे प्रतिज्ञापत्र. (छायांकित प्रत जोडावी) | |
| 12 | निविदाधारक किंवा त्यांच्या संस्थेवर कोणत्याही प्रकारचा दंडात्मक/दखलपात्र गुन्हा नसल्याचे प्रमाणपत्र आहे. (छायांकित प्रत जोडावी) | |
| 13 | शासकीय कार्यालयात वाहन सेवा पुरवठा केलेला असल्यास त्याबाबतचे | |

| | | |
|---|---|---|
| | अनुभव प्रमाणपत्र. | |
| 14 | बयाणा रक्कम भरल्याने चलन (छायांकित प्रत) | |
| 15 | वाहतूक परवाना प्रमाणपत्राची अद्ययावत प्रत. | |
| 16 | राष्ट्रीयकृत बँकेचे रुपये 1,00,000/- पर्यंतचे नजीकच्या कालावधीचे मुळ सॉलव्हन्सी सर्टिफिकेट | |

**दिनांक :**

**ठिकाण :-**

**निविदाधारकाचे नाव :**

**सही/शिक्का**

**निविदा फॉर्म क्रमांक - 2**

**व्यापारी किंवा दरसंबंधी लिफाफा**

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिक यांचेकडे वाहनभाडे तत्वावर पुरविण्यासाठी अधिकृत एजन्सी/ अभिकर्ता एजन्सीची नेमणूक करण्याकरीता सीलबंद निविदा मध्ये दिलेल्या सूचनांनुसार खालीलप्रमाणे दरपत्रक व इतर बाबींची माहिती देत आहोत.

| अ.क्र. | वाहन तपशील | वाहन संख्या | दर तपशील |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | **गाडीचे** 1.**दरमहा** 2000 **कि.मी. पर्यंतचा एकत्रित दर** (**प्रती दिवस**)<br>2.**प्रती कि.मी. दर** (2000 **कि.मी. नंतर**)<br>(**यामध्ये वाहन चालकाचे वेतन, पार्किंग, टोल टॅक्स व इतर भत्ते, इंधन व वंगण, रात्रीचा खोळंबा, दुरुस्ती इं.**) **सर्व खर्चाचा समावेश राहील.**<br>**मारुती सुझुकी एर्टिगा/टोयोटा रुमिऑन**(7+1)**सीटर** - 01 | 01 | 2. **प्रति महिना दर** (2000 **कि.मी.**)<br><br>2. **प्रति किमी दर** (2000 **कि.मी. नंतर**) |
| 2 | **गाडीचे** 1. **दरमहा** 2000 **कि.मी. पर्यंतचा एकत्रित दर** (**प्रती दिवस**)<br>2.**प्रती कि.मी. दर** (2000 **कि.मी. नंतर**)<br>(**यामध्ये वाहनचालकाचे वेतन, पार्किंग, टोल टॅक्स व इतर भत्ते, इंधन व वंगण, रात्रीचा खोळंबा, दुरुस्ती इं.**) **सर्व खर्चाचा समावेश** | 01 | 2. **प्रति महिना दर** (2000 **कि.मी.**)<br><br>2. **प्रति किमी दर** (2000 **कि.मी. नंतर**) |

| | | | |
|---|---|---|---|
| | **राहील.**<br>**टोयोटा ईटिऑस / मारुती स्विफ्ट डिझायर कार- 01** | | |

**दिनांक :**

**ठिकाण :-**

**निविदाधारकाचे नाव : _______**

**सही/शिक्का**

Signature Not Verified
Digitally signed by Yogesh Subhashrao Patil
Date: 2026.03.11 16:52:05 IST
Location: Maharashtra-MH